# वसई विरार शहर महानगरपालिका

## वैद्यकीय आरोग्य विभाग

वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना 3 जूलै 2009 रोजी करण्यात आली. सन 2011 च्या जनगणनेनुसार महानगरपालिकेची लोकसंख्या 12,21,233 एवढी होती परंतु सद्यस्थितीत सदर लोकसंख्या अंदाजे 17 लक्ष एवढी झाली आहे. महानगरपालिकेचा वैद्यकीय आरोग्य विभाग दि. 14 जून 2011 रोजी अस्तित्वात आला. महानगरपालिका कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत महानगरपालिकेची 2 रुग्णालये, 3 माता बाल संगोपन केंद्र तसेच विविध ठिकाणी 21 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, 9 दवाखाने, शहर क्षयरोग कार्यालय, केंद्रीय औषधी व वैद्यकीय आरोग्य विभाग कार्यरत असून या सर्व विभागाचे कामकाजाकरीता महानगरपालिकेने 6 महिन्याचे कंत्राटी तत्वावर तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी असे एकूण 554 कर्मचाऱ्यांची नियुक्ती व 42 मानद तत्वावर तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे. महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागात रुग्णालये व दवाखाने नोंदणी व नुतनीकरण, पीएनडीटी व एमटीपी (गर्भधारणा पूर्व व प्रसवपूर्व निदानोपयोगी तंत्र अधिनियम व गर्भपात कायदा), जलजन्य व किटकजन्य आजार नियंत्रण इ. विभाग कार्यरत आहेत. रुग्णालयामध्ये बाहयरुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, शस्त्रक्रिया विभाग, प्रसुती विभाग, दंत चिकित्सा विभाग, क्ष-किरण विभाग, प्रयोगशाळा विभाग, सोनोग्राफी विभाग, डायलेसिस विभाग, नवजात बालक अतिदक्षता विभाग, इंटिग्रेटेड कौन्सिलिंग एंड टेस्टिंग सेंटर्स (ICTC) व आय.सी.यु. इत्यादी विभाग कार्यरत असुन विविध आजारांवर रुग्ण आंतर रुग्ण दाखल होत असतात.

**महानगरपालिकेची रुग्णालये व माताबाल संगोपन केंद्र यांमार्फत सन 2018 -19 मध्ये खालीलप्रमाणे सेवा पुरविण्यात आल्या आहेत.**

| अ.क्र. | विभाग | रुग्णांची संख्या |
|---|---|---|
| 1 | बाहय रुग्ण | 679806 |
| 2 | आंतर रुग्ण | 111481 |
| 3 | प्रसुति (Normal + LSCS) | 10990 + 2213<br>एकूण 13203 |
| 4 | शस्त्रक्रिया | 3201 |
| 5 | क्ष-किरण | 19254 |
| 6 | सोनोग्राफी | 14216 |
| 7 | डायलेसिस | 2027 |
| 8 | गरोदर माता तपासणी (ANC) | 24881 |

**महानगरपालिकेची रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्र, ना.प्रा.आरोग्य केंद्र व दवाखाने यांमध्ये नेमणूक करण्यात आलेले तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी संख्या खालीलप्रमाणे-**

| अ. क्र. | रुग्णालयाचे नाव | तज्ञ वैद्यकीय अधिकारी | | वैद्यकीय अधिकारी | | पी. एच. एन | जी. एन. एम | ए. एन. एम. | प्रयोग शाळा तंत्रज्ञ | औषध निर्माता | क्ष-किरण | समुपदेष्टा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पूर्णवेळ | मानद | एम.बी.बी.एस | बी.ए.एम.एस | | | | | | | |
| 1. | सर.डी.एम. पेटीट रुग्णालय, वसई (प.) | 05 | 21 | 01 | 14 | 00 | 34 | - | 07 | 07 | 03 | 01 |
| 2. | विजयनगर- तुळींज रुग्णालय,नालासोपारा (पू.) | 09 | 21 | 03 | 15 | 01 | 40 | - | 08 | 09 | 04 | 02 |
| 3. | माताबाल संगोपन केंद्र, सातिवली | 02 | 02 | 01 | 08 | 01 | 11 | - | 04 | 04 | - | 01 |
| 4. | माताबाल संगोपन केंद्र, सर्वोदय वसाहत | 03 | 02 | - | 08 | 01 | 15 | - | 02 | 04 | - | 01 |
| 5. | माताबाल संगोपन केंद्र, जुचंद्र | 03 | 02 | 01 | 06 | 01 | 11 | - | 04 | 04 | - | - |
| 6. | 21 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र | - | - | - | 24 | - | 21 | 170 | 21 | 21 | - | - |
| 7. | 8 दवाखाने | - | - | - | 08 | 0 | - | 08 | - | - | - | - |
| | **एकुण** | 21 | 48 | 06 | 83 | 04 | 132 | 178 | 46 | 49 | 07 | 05 |
| | | | | | | | | | | | | |

**महानगरपालिकेच्या रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, माताबाल संगोपन केंद्र यांचेमार्फत खालील उपक्रम राबविण्यात येतात -**

**<u>नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र</u>**

- बाहयरुग्ण सेवा
- गरोदर पूर्व तपासणी
- श्वानदंश व इतर प्रतिबंधात्मक औषधे
- क्षयरोगावरील औषधोपचार
- प्राथमिक रक्त चाचण्या
- नियमित लसिकरण सत्र
- राष्ट्रीय कार्यक्रम

**<u>माताबाल संगोपन केंद्र</u>**

- गरोदरपूर्व व प्रसुतिपश्चात तपासणी व समुपदेशन सेवा
- आवश्यक रक्त चाचण्या
- प्रसुति सेवा (नैसर्गिक व सिझेरीयन)
- स्त्रीरोग तज्ञांकडून तपासणी सेवा
- आवश्यक औषधे
- रक्त व रक्त घटक पुरवठा
- रुग्णवाहिका सेवा
- राष्ट्रीय कार्यक्रम

**<u>रुग्णालय</u>**

- बाहयरुग्ण/आंतररुग्ण सेवा
- गरोदरपूर्व व प्रसुतिपश्चात तपासणी व समुपदेशन सेवा
- प्राथमिक रक्त चाचण्या, क्ष-किरण, सोनोग्राफी, दंतचिकित्सा व शस्त्रक्रिया विभाग
- विशेष तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी सेवा
- नवजात शिशु विभाग (NICU)
- अति दक्षता विभाग, डायलेसिस विभाग (तुळींज रुग्णालय)
- रक्त व रक्त घटक पुरवठा
- रुग्णवाहिका सेवा
- आय.सी.टी.सी विभाग (एच.आय.व्ही. ग्रस्त रुग्णसेवा)
- क्षयरोगावरील औषधोपचार